## १२.अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणेबाबत

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | आयुक्त,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य,नाशिक |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. १५२२-प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि ७ मार्च २०२४<br>२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. १५२२- प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि १२ जुलै २०२४<br>३) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. १५२२- प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि ९ सप्टेंबर २०२४ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | एम.बी.ए. (पदव्युत्तर), बी.टेक (इंजिनअरिंग) (पदवी / पदव्युत्तर), विज्ञान (पदवी / पदव्युत्तर), कृषी (पदवी / पदव्युत्तर), इतर विषयाचे अभ्यासक्रम (पदवी / पदव्युत्तर) मधील एकूण ४० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल<br>अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा यासाठी या योजनेतंर्गत शिक्षण शुल्क, भोजन, निवास, प्रवास, प्रासंगिक भेटी, इ. अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी सहाय्य केले जाते. तसेच व्हिजा, आरोग्य विमा व येण्या-जाण्याचा विमानाचा खर्च शासनामार्फत करण्यात येतो. |
| ०४ | पात्रता/निकष | १. विद्यार्थी अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्रधारक असावा<br>२. विद्यार्थ्याला परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची रँक ३०० च्या आत असलेल्या विद्यापीठात प्रवेश मिळालेला असावा.<br>३.विद्यार्थ्यांच्या पालकांचे / कुटुंबाचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.१०.०० लाखापेक्षा जास्त नसावे.<br>४.सदर शिष्यवृत्ती आदिवासी एकाच कुटूंबातील दोन व्यक्तीस अनुज्ञेय राहील. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | • अर्ज नमुना https://fs.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | • सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | पदवी / पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुरावे.<br>परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याबाबत विनाअटी (Unconditional) ऑफर लेटर, आवश्यक ते करारनामे हमीपत्रे व शासन निर्णयातील इतर आवश्यक कागदपत्रे. |